| | |
|---|---|
| MHJN100009622025 | दाखल दिनांक ११/०८/२०२५<br>नोंदणी दिनांक ११/०८/२०२५<br>निकाल दिनांक १७/०३/२०२६<br>कालावधी ०० व. ०७ म. ०६ दि. |

**मंठा येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे न्यायालयात**

(**पिठासीन अधिकारी – श्रीमती एल. पी. धन्वे**)

**कि. दि. अर्ज क्र. १०८/२०२५** **निशाणी क्र.२१**

१) **ममता भ्र. पवन पवार,**
वय २१ वर्ष, धंदा घरकाम

२) **सिया पि. पवन पवार**
वय २ वर्ष,
अ.पा.क. अर्जदार क्र. १ आई
दोघेही रा. गारटेकी, ता. मंठा, जि. जालना. .. **अर्जदार**

**– विरुध्द –**

**पार्वतीबाई भ्र. शेषराव पवार,**
वय सज्ञान, धंदा – घरकाम,
रा.गारटेकी, ता. मंठा, जि. जालना ... **गैरअर्जदार**

---

श्री. एस.आर. झोल, अर्जदारातर्फे वकील
श्री. ऐ.आर. देशपांडे, गैरअर्जदारातर्फे वकील

---

**<u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>**

(पारीत दिनांक :– १७/०३/२०२६)

**१.** अर्जदार क्र. २ सिया पवन पवार हिचे वय २ वर्षे असून ती अज्ञान आहे. सदरचा अर्ज हा अर्जदार क्र. २ ची आई ममता पवन पवार (अर्जदार क्र. १) यांनी अज्ञान पालन कर्ता (यापुढे **अ.पा.क**. असे संबोधण्यात येईल) या नात्याने अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ हिचे वडील **पवन शेषराव पवार** यांचा मृत्यु दि. १३/०६/२०२५ रोजी मौजे गारटेकी, ता. मंठा, जि. जालना येथे झाला. अर्जदारांनी अर्जदार क्र. १ व २ तसेच गैरअर्जदार हया मयत यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केली.

**२.** अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी मयत **पवन शेषराव पवार** यांची आई पार्वतीबाई शेषराव पवार यांना विचारणा केली असता त्यांनी अर्जदार म्हणून समाविष्ट होण्यास नकार दिला त्यामुळे त्यांना गैरअर्जदार म्हणून प्रस्तुत प्रकरणात अर्ज दाखल करते वेळी समाविष्ठ केले व पुढे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ व २ तसेच गैरअर्जदार हे मयत **पवन शेषराव पवार** यांचे एकमेव कायदेशीर वारस असून मयतास त्यांच्या व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे व त्यांना शासकीय व निमशासकीय कांमाकरीता मयताच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे त्यांना मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याची विनंती केली.

**३.** गैरअर्जदार ही विधीज्ञांमार्फत प्रकरणात हजर झाली. गैरअर्जदार यांनी नि.क्र. १० वर लेखी म्हणणे सादर करुन कथन केले आहे की, मयत **<u>पवन शेषराव पवार</u>** याने त्याच्या असलेल्या भारतीय स्टेट बँक शाखा मंठा या बँकेमध्ये

येणा–या सर्व रक्कमेस उत्तराधिकारी म्हणून त्याचे वडील शेषराव पवार यांचे नाव नोंद केलेले आहे. तसेच त्यास जिवन विमा व ईतर मिळणा–या रक्कमेवर त्याचे वडील शेषराव पवार यांना उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. अर्जदार क्र. १ ही सदरील वारस प्रमाणपत्र हस्तगत करुन घेवून त्या वारसा प्रमाणपत्राअधारे मयताच्या नावे मिळणारी सर्व रक्कम स्वतःला मिळावी या प्रयत्नात आहे. वारस प्रमाणपत्र हस्तगत करुन अर्जदार त्याचा उपयोग मयताच्या नावे असलेली मिळकत, जिवन विमा रक्कम किंवा त्याचे बँकेतील रोख रक्कम उचलून घेण्यासाठी करणार नाही असा स्पष्ट निर्देश प्रमाणपत्रासोबत मा.न्यायालयाकडून देणे न्याय व गरजेचे आहे व या अटी व शर्तींवरच अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज नाकारण्याची विनंती केली आहे.

**४.** प्रस्तुतचा अर्ज, गैरअर्जदार यांचा लेखी खुलासा व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज निर्णयांकीत करणेकामी खालील मुद्दे विचाराधीन होतात. मी त्यांचे उत्तर खालील नमुद केलेल्या कारणास्तव पुढील प्रमाणे नोंदविलेले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र. १, २ व गैरअर्जदार हे मयत यांचे कायदेशिर वारस असल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | होय |
| २ | अर्जदारांनी विनंती केल्याप्रमाणे अर्जदार वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय |
| ३ | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते २ करीता**:–

५. अर्जदाराने कागदपत्रांच्या यादीसोबत अर्जदाराच्या वतीने मयत **पवन शेषराव पवार** यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र. १७ वर, अर्जदार क्र. १ यांचे शपथपत्र नि.क्र. ११ वर दाखल केले आहे. नि.क्र. १६ वर अर्जदार क्र. १ च्या आधारकार्डची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. नि.क्र. १८ वर अर्जदार क्र. २ च्या आधारकार्डची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. तसेच नि.क्र. १९ दि. ०१ सप्टेंबर २०२५ रोजीचे वर दैनिक जगमित्र मधील जाहिर प्रगटन दाखल केले आहे. अर्जदाराने त्यांचा पुरावा पुरसीस दाखल करून बंद केला आहे.

६. तसेच गैरअर्जदाराने नि.क्र. १० वर लेखी जवाब व लेखी जवाबाच्या पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केले आहे.

७. अर्जदार व गैरअर्जदार यांनी **पवन शेषराव पवार** हे मयत असल्याचे मान्य केले आहे. तसेच नि.क्र. १७ वरील मृत्यु प्रमाणपत्रावरून हे निश्चित होते की, **पवन शेषराव पवार** हे दि. १३/०६/२०२५ रोजी मौजे गारटेकी, ता. मंठा, जि. जालना येथे मयत झाले आहेत.

८. प्रस्तुत प्रकरणात महत्वाचा वादातील मुद्दा हा आहे की, मयत **पवन शेषराव पवार** यांचे कायदेशीर वारस कोण आहेत व त्यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यास कोण पात्र आहेत.

९. अर्जदारांच्या वतीने अर्जदार क्र. १ ममता पवन पवार यांनी नि. क्र. ११ वरील पुराव्याचे शपथपत्रात असे नमुद केले आहे की, मयत **पवन शेषराव पवार** हे त्यांचे पती असून अर्जदार क्र. २ सिया पवन पवार हि मयताची मुलगी

आहे. तसेच गैरअर्जदार पार्वतीबाई शेषराव पवार ही मयत **पवन शेषराव पवार** यांची आई आहे. तसेच गैरअर्जदाराने देखील त्यांच्या लेखी जवाबात मयताचे अर्जदार व गैरअर्जदार यांचे नातेसंबंध मान्य केलेले आहेत. तसेच दोघांनी हे मान्य केले आहे की, मयत **पवन शेषराव पवार** यांचा मृत्यु हा दि. १३/०६/२०२५ रोजी झालेला आहे. त्यामुळे असे दिसून येते की, मयत यांना अर्जदार क्र. १ व २ तसेच गैरअर्जदार हया तिघी वारस आहेत.

**१०.** याउलट गैरअर्जदार यांनी नि.क्र. १० वर पुरावा दाखल केला असून कथन केले आहे की, अर्जदार यांनी गैरअर्जदारास जाणुनबाजुन काही आर्थिक मदत मिळू नये या हेतूने प्रेरित होवून त्यांना अर्जात अर्जदार म्हणून समाविष्ट केलेले नाही. तसेच मयत **पवन शेषराव पवार** यांच्या जिवन विम्याची रक्कम व स्थावर मिळकत मिळविण्याकरीता अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज सादर केलेला आहे.

**११.** अर्जदार व गैरअर्जदार यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार क्र. १ व २ व गैरअर्जदार हया मयत **पवन शेषराव पवार** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वाद नाही. गैरअर्जदार यांनी कथन केल्याप्रमाणे अर्जदार हे मयत यांच्या जिवन विम्याची रक्कम काढूण घेण्याच्या प्रयत्नात आहेत, परंतु प्रस्तुत प्रकरणात अर्जदारांनी संपत्ती बाबत व विम्याच्या रक्कमेबाबत कोणतीही मागणी केलेली नाही. अर्जदारांनी केवळ मयत **पवन शेषराव पवार** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी मागणी केली आहे. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे त्यांना सदर वारस प्रमाणपत्र हे शासकीय व निमशासकीय कामांसाठी हवे आहे. त्यांनी अर्जामध्ये विम्याची रक्कम व कोणत्याही चल व अचल मालमत्तेचा उल्लेख केलेला नाही. अर्जदारांनी तशी कोणतीही मागणी केलेली नसल्यामुळे गैरअर्जदाराच्या आक्षेपात कोणतेही तथ्य असल्याचे

दिसून येत नाही.

**१२.** अर्जदार व गैरअर्जदार हे धर्माने हिंदु आहेत. त्यामुळे हिंदु वारसा कायद्या प्रमाणे एखादा पुरूष मयत झाल्यानंतर त्यास मुलगा, मुलगी, विधवा पत्नी, आई, नातु, नात वगैरे वर्ग–१ मधील वारस असतात. मयत पुरूषाचे वडील, भाउ व बहिण हे वर्ग–२ मधील वारस असतात. तसेच हिंदु वारसा कायदा कलम ८ प्रमाणे मयत पुरूषास त्याचे वर्ग–१ मधील वारस असल्यास वर्ग– २ वारसांना सदर मयत पुरूषाचे वारस म्हणुन कोणतेही हक्क व अधिकार प्राप्त होत नाहीत. प्रस्तुत प्रकरणात मयत **पवन शेषराव पवार** यास अर्जदार क्र.१, २ व गैरअर्जदार क्र. १ हेच कायदेशीर व वर्ग–१ मधील वारस आहेत हे उपलब्ध पुराव्यावरून स्पष्ट होते. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे हिंदु वारसा कायदा कलम ८ चे अनुषंगाने फक्त अर्जदार क्र.१, २ व गैरअर्जदार क्र. १ हेच मयत **पवन शेषराव पवार** यांचे वर्ग–१ चे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब मी मुद्दे क्र.१ ते २ यांचे उत्तर होकारार्थी नोंदविले आहेत.

**मुद्दा क्र.३ करीता**:–

**१३**. मी मुद्दे क्र.१ ते २ यांचे नोंदविलेले उत्तराप्रमाणे मयत **पवन शेषराव पवार** यांचे अर्जदार क्र.१, २ व गैरअर्जदार हे वारस असून तेच मयत **पवन शेषराव पवार** यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असल्याने मी मुद्दा क्र. ३ चे उत्तरार्थ पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज **मंजुर** करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ **ममता भ्र. पवन पवार,** अर्जदार क्र. २ **सिया पवन पवार** व गैरअर्जदार **पार्वतीबाई भ्र. शेषराव पवार** हे मयत **पवन शेषराव पवार** यांचे

कायदेशीर वारस असले बाबतचे वारसाचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे.

३. अर्जदार व गैरअर्जदार यांनी आपआपला खर्च सोसावा.

४. सबब, संचिका निकाली काढण्यात आली.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.03.18 10:42:05 +0530

(**एल. पी. धन्वे**)

दिनांक : १७/०३/२०२६

दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर)
मंठा.

 दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६८/२०२४
कमल व ईतर वि. जिजाबाई

**प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नावे – अक्षय ईश्वर देशपांडे
न्यायालयाचे नाव – दिवाणी न्यायालय (क.स्तर), मंठा
पिडीएफ दिनांक – १७/०३/२०२६

स्वाक्षांकीत/–
लघुलेखक